# मानसिक आजारांवर परिसंवाद

मुंबई, दि. २५ (प्रतिनिधी) - मानसिक आरोग्य आणि सर्जनशीलता या विषयावर नुकताच 'ब्युटिफूल माइंड' नावाचा परिसंवाद पार पडला. काळा घोडा महोत्सवांतर्गत वांद्रेवाला फाऊंडेशनतर्फे हा परिसंवाद आयोजित करण्यात आला. मानसिक आजारांविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी ही चर्चा झाली.

चर्चेत गुजराती कवी आणि समीक्षक दिलीप झवेरी, मराठी कवी आणि दृष्य कलावंत संजीव खांडेकर, लेखक, कलावंत दीपाली परमार-हॅव्होर्थ आणि वांद्रेवाला फाऊंडेशनचे कार्यकारी उपाध्यक्ष डॉ. अरुण जॉन यांनी सहभाग घेतला होता. या चर्चेत सहभागी झालेल्या वक्त्यांनी सर्जनशीलता आणि वेडेपणात संबंधाचे पुरावे काय आहे? या संबंधाबाबत जैविक किंवा मानसिक, कोणते कारण दिले जाते? आणि यासंबंधापायी सर्जनशील लोकांना समजून घेण्यासाठी आमचे मत काय असते? 'वेडा बुद्धिमं' हा संकल्पना ही एक सरळसोपी पण जुनाट कल्पना आहे काय? मानसिक दु:खामुळे सर्जनशीलतेत 'वाढ होते का? अशा प्रकारच्या मुद्यांवर चर्चा केली.